MHNG030012172024

**नियमित फौजदारी खटला/२२७/२०२४**
**महाराष्ट्र शासन वि.. मंदार अनिरुध्द कोलते**

## निशाणी क्र. ८४ खालील आदेश

(दिनांक १७ मार्च २०२६)

अर्जदार यांनी सदरचा अर्ज धंतोली पोलीस स्टेशन, नागपूर यांनी गु.र.नं. ४४०/२०२३ मध्ये जप्त केलेले वाहन **हुंडाई कंपनीचे Alcazar Car** ज्याचा रजि. नं.GJ-06-PF-8824 असा असून चेसीस क्र.MALPC813LMM605071 व इंजिन क्र.D4FALL346939 असा आहे. सदर वाहन अर्जदाराने त्याचे ताब्यात मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार याचा सदर गुन्हयाशी कसलाही संबंध नाही. अर्जदार हा प्रस्तुत वाहनाचा मालक आहे. सदरचे वाहन एकाच जागेवर बंद अवस्थेत उभे राहिल्यास सदर वाहनाचे इंजिन, टयुब, टायर मध्ये खराबी होऊन अर्जदाराचे अतोनात नुकसान होण्याची शक्यता आहे. करीता अर्जदाराने सदरचे वाहन पूर्ववत त्यांचे ताब्यात देण्यात यावे अशी विनंती केली आहे.

२. सरकारी वकीलांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले असून त्यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा आहे. जप्त वाहन अर्जदारास परत केल्यात ते वाहन पुन्हा अशा प्रकारच्या गुन्हयात वापरण्याची शक्यता असल्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास तपासी अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.८५–ए अन्वये दाखल केले असुन त्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये सदरचे वाहन गुन्हयामध्ये वापरण्यात आले असल्याने प्रस्तुतचे वाहन आरोपीला परत करण्यास आक्षेप नोंदविला. गुन्हयाचा तपास सुरु असुन जप्त वाहन गुन्ह्यामध्ये पुन्हा वापरण्याची शक्यता आहे, तसेच जप्त वाहन अर्जदारास परत केल्यास तो पुन्हा अशा प्रकारच्या गुन्हयात वापरण्याची शक्यता असल्याने वाहन परत देण्यास हरकत घेतलेली आहे.

४. दोन्ही पक्षांतर्फे स. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

५. अर्जदाराने प्रस्तुत प्रकरणी त्याचे शपथपत्र दाखल करुन कथन केले की, सदरचे वाहन हे तपासकामी जप्त करण्यात आले आहे. अर्जदारातर्फे वाहनाचे पर्टीकुलरर्सची छायांकित प्रत दाखल करण्यात आली आहे. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता अर्जदार हा सदयस्थितीत जप्त वाहनाचा मालक व ताबे कब्जेदार असल्याचे दिसुन येते. प्रस्तुत गुन्हा हा आरोपींनी दिनांक ०७.१२.२०२२ ते ०३.०२.२०२३ दरम्यान केल्याचा आरोप दोषारोपपत्रामध्ये ठेवण्यात आलेला आहे. उलटतपक्षी, प्रस्तुतचे वाहन आरोपीने प्रस्तुत गुन्हा घडण्यापुर्वी म्हणजेच दिनांक ०६.०९.२०२१ रोजी खरेदी केल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रस्तुत वाहन प्रथमदर्शनी आरोपीने फसवणूक केलेल्या पैश्यातून खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

६. मी **मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सुंदरभाई अंबालाल देसाई विरुध्द गुजरात शासन ए.आय.आर.२००३ सर्वोच्च न्यायालय पान क्र.६३८** मध्ये दिलेल्या न्यायनिवाड्याचे अवलोकन केले. सदर निवाड्यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे स्पष्ट केले आहे की, जप्त वाहन पोलीस ठाण्यात जास्त काळ न ठेवता त्या संदर्भात लवकरात लवकर योग्य ते आदेश करावेत.

७. वाहन मोकळया हवेत विना वापर ठेवल्यास त्यामध्ये बिघाड होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत जप्त वाहन विना वापर एका जागेवर केसचा निर्णय होईपर्यंत उभे ठेवण्यात काहीच उपयोग नाही. तसेच प्रस्तुत वाहनाची मालकी दाखवणारा दुसरा इसम या प्रकरणात हजर झालेला नाही. त्यामुळे सदरचे वाहन जप्त ठेवुन कोणताही उपयोग होणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता सदर वाहन अटी व शर्तींवर अर्जदाराच्या अंतरिम ताब्यात देणे उचित होईल. करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार **मोहम्मद जवाद फारूख बोरा उर्फ भरत उर्फ सुलेमान** यांनी सदर वाहनाच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल करु नये.

३. अर्जदार यांनी सदर वाहन न्यायालय किंवा तपासी अंमलदार ज्या ज्या वेळी आदेशीत करतील त्या त्या वेळी हजर ठेवावे.

४. अर्जदार यांनी सदर वाहन कोणत्याही प्रकारे विक्री अथवा हस्तातंरीत करु नये.

५. तपासी अंमलदार धंतोली पोलीस स्टेशन, नागपूर/आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी गु.र.नं.४४०/२०२३ मध्ये जप्त वाहन **हुंडाई कंपनीचे Alcazar Car** ज्याचा रजि. नं.GJ-06-PF-8824 असा असून चेसीस क्र.MALPC813LMM605071 व इंजिन क्र.D4FALL346939 हे अर्जदार **मोहम्मद जवाद फारूख बोरा उर्फ भरत उर्फ सुलेमान** यांच्या ताब्यात रक्कम रुपये २०,००,०००/– (रुपये वीस लाख) च्या हमी पत्रावर (Indemnity Bond) खालील अटींवर देण्यात यावे.

**अ.** तपासी अंमलदार यांनी सदर वाहनाचे पुढून मागून व इतर दोन बाजुंनी फोटो काढावेत.

**ब.** तपासी अंमलदार यांनी सदर वाहनाच्या सद्य परिस्थिती बाबत सविस्तर पंचनामा करावा.

**क.** हमीपत्र, फोटो व त्याचे निगेटीव्ह तसेच पंचनामा न्यायालयात त्वरीत दाखल करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by KAUSTUBH NAGESH MARATHE
Date: 2026.03.17 15:35:04 +0530

दिनांक १७/०३/२०२६
नागपूर.

**( कौस्तुभ नागेश मराठे )**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. १),
नागपूर.